

# ' सेवांकुर ' विषयी काही. . .

स्वामी विवेकानंद देशातील शिक्षणाविषयी नेहमी म्हणायचे, ' जर देशातील मुले शाळेकडे येऊ शकत नसतील, शाळेने मुलांकडे जायला हवे आणि उद्याची सक्षम, चारित्र्यवान पिढी घडवायला हवी. '

हाच विचार घेऊन आम्ही 'सेवांकुर प्रकल्पा'द्वारे मुलांपर्यंत शिक्षण घेऊन जात आहोत, उद्याची कौशल्ययुक्त, सक्षम, चारित्र्यवान पिढी घडवण्याचा प्रयत्न करत आहोत.

सेवांकुरचा आम्हाला अभिप्रेत अर्थ हा ' युवकांच्या सेवेतून फुलणारा शिक्षणाचा अंकुर ' असा आहे.







विद्योदय मुक्तांगण परिवार फौंडेशन संचलित ,

# सेवांकुर प्रकल्प

माये ग माये, नको तोडू माझी शाळा..!

सेवांकुर

विद्योदय
।।बालो देवो भव:।।









# आम्ही कोण आहोत ?




**टाटा सामाजिक शास्त्र संस्था येथून शिक्षण विषयातील उच्चशिक्षित तरुणांनी सुरु केलेली 'विद्योदय' ही 'शिक्षण' सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणारी सामाजिक संस्था आहे.**

**विनायक (TISS, M.A. Education), ऋषिकेश (TISS, Ph.D. Education) सार्शा (TMV, MSW), सौरभ (ISDM, PGDM) या तरुणांच्या या धडपडीला आपल्याकडून सहकार्य मिळावे ही अपेक्षा.**

# सेवांकुर प्रकल्पाची उद्दिष्टे

- शिक्षणाची गोडी निर्माण करणे
- मुलांच्या सर्वांगीण क्षमता वाढवणे
- मुलांमध्ये शारीरिक स्वच्छतेची आवड निर्माण करणे
- ऊसतोड मजुर स्त्रियांसाठी पाळणाघर सुविधा उपलब्ध करून देणे
- मुलांच्या वर्तनात चांगली मुल्ये रुजवणे
- मुलांच्या जीवन कौशल्यांचा विकास करणे

# सेवांकुर प्रकल्पाचा कृती कार्यक्रम

- हसत-खेळत शिक्षणाद्वारे मुलांना शिक्षांची गोडी लावणे
- आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे
- मुलांना पोषण आहार पुरवणे
- मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- अंकगणित, भाषा विषयासंबंधी खेळ व अध्ययन तासिका घेणे
- ' बालसभा ' सारख्या विद्यार्थीकेन्द्री उपक्रमांचे आयोजन करणे
- पालक मेळावा घेऊन मुलांच्या समस्यांचे निराकरण करणे
- 'गंमत सहल, क्रीडा स्पर्धांचे आयोजन करत मुलांच्या जगण्याचा आनंद द्विगुणीत करणे

# सेवांकुर प्रकल्पामुळे घडणारे बदल

- विद्यार्थ्यांच्या शालेय अभ्यासातील गुणवत्तेत वाढ झाली
- मुले आपल्या गावच्या शाळेत अधिक उत्स्फूर्त सहभाग नोंदवू लागली
- मुलांमधील आत्मविश्वासात कमालीची वाढ झाली
- मुला-मुलींमध्ये नेतृत्वाची भावना वाढीस लागली
- मुलांची शिकण्याची इच्छा अधिक प्रबळ झाली



**साखर शाळेसाठी ऊस तोड मजुरांच्या राहत्या ठिकाणी जाऊन सर्वेक्षण करताना**

सकाळ

# ऊस तोडणी मुलांसाठी साखर शाळा

इचलकरंजी, ता. ५ : ऊस तोडणीच्या निमित्ताने हंगामी स्थलांतर झालेल्या कुटुंबांसोबत आलेल्या मुलांना अब्दुललाट (ता. शिरोळ) येथे हक्काची शाळा मिळाली आहे. अब्दुललाट येथील विद्योदय मुक्तांगण परिवारातर्फे या मुलांसाठी सेवांकुर साखर शाळा या नावाने हंगामी शाळा सुरू केली आहे. यातून २५ विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणार आहे.

ऊस तोडणीच्या निमित्ताने हातकणंगले आणि शिरोळ तालुक्यात अनेक कुटुंबे स्थलांतरित होऊन येतात. या कुटुंबासोबत त्यांची लहान मुले असतात. अनेक ठिकाणी ही मुले नजीकच्या शाळेत जातात, मात्र वाडीवस्तीपासून दूर असणाऱ्या मुलांना हक्काची शाळा मिळतच नाही. अशा मुलांसाठी विद्योदय संस्थेच्या वतीने २ वर्षे हंगामी साखर शाळेच्या माध्यमातून शिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. यावर्षी पूरस्थितीमुळे ऊसतोडणी हंगाम लांबला. त्यामुळे नुकतेच या परिसरात ऊस तोडणी करणारे कामगार दाखल झाले आहेत. या मजुरांच्या मुलांसाठी ही शाळा सुरू केली आहे.

या शाळेचे उद्घाटन गणेश नायकुडे, विनायक गद्रे, शशिकांत मद्धापुरे, अख्तर मकानदार यांच्या उपस्थितीत झाले. संस्थेचे सचिव सारसा माळी यांनी प्रास्ताविक केले. स्मिता मोठे यांनी सूत्रसंचालन केले. अंकुश पाटील, यशवंत कोळी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष विनायक माळी यांनी आभार मानले.



**इचलकरंजी : अब्दुललाट येथील विद्योदय मुक्तांगण परिवार या संस्थेने या मुलांसाठी सेवांकुर साखर शाळा या नावाने हंगामी शाळा सुरू केली आहे.**









# प्रेमळ आवाहन

**विद्योदय संस्था कोणतीही शासकीय मदत न घेता समाजातील आपल्यासारख्या सहृदयी व दानशूर व्यक्तींच्या आर्थिक मदतीने 'सेवांकुर'सारखे अनेक प्रकल्प व उपक्रम राबवत आहे.**

**शिक्षणाच्या माध्यमातून 'कौशल्यपूर्ण' भारतीय तरुणाईचे स्वप्न पहात आम्ही गेली ५ वर्षे वाटचाल करत आहोत. यामध्ये आपणही खालीलप्रमाणे आपला खारीचा वाटा उचलू शकता :**

**१. आपला वाढदिवस मुलांसोबत साजरा करा.**<br>
**२. सेवांकुर साखर शाळेस सदिच्छा भेट द्या.**<br>
**३. सेवांकुर साखर शाळेत मुलांसोबत गपा-गोष्टी-गाणी-खेळ खेळायला, त्यांना आपुलकीचा हात द्यायला जरूर या.**<br>
**४. आपल्याला शक्य होईल तेवढे या प्रकल्पास आर्थिक सहाय्य करा.**



# सेवांकुर प्रकल्प - पार्श्वभूमी

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा व इतर प्रांतातून तसेच शेजारच्या राज्यांतून पश्चिम महाराष्ट्रातील 'साखर पट्टा' ओळखल्या जाणाऱ्या सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात लाखो ऊसतोड कामगारांचे उसतोड काळात स्थलांतर होत असते. या ४-५ महिन्याच्या कालावधीत या कामगारांसोबत येणाऱ्या मुलांची शाळा नसल्याने होणारी विद्यार्थी गळती ही गंभीर बाब आहे.

या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये व ते बालकामगार म्हणून उसाच्या फडात जाऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला होऊ नयेत, म्हणून 'विद्योदय मुक्तांगण परिवार फौन्डेशन' ने २०१६ पासून ' सेवांकुर साखर शाळा ' हा उपक्रम हाती घेतला. यातून मुलांची शिक्षणाची गोडी टिकून राहावी, म्हणून २ गावातील पालाजवळ सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी 'सेवांकुर साखर शाळा' भरते.

# सेवांकुर प्रकल्प - भविष्य वेध

माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलामांच्या स्वप्नातील भारतात प्रत्येक मूल हे स्वावलंबी, आत्मनिर्भर व जीवन कौशल्यांनी युक्त असेल, अशा आशावाद होता. हा विचार सत्यात उतरवण्यासाठी आम्ही या मुलांसाठी ज्ञान मंदिर उभे करून तिथे त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ठरवले आहे.



आम्हाला या मुलांसाठी खेळ, गायन, मूर्तिकामासारखी जीवन कौशल्ये उपलब्ध करून द्यायची आहेत. मुले येथे आपल्या कृतींतून शिकण्यासाठी प्रयत्न करतील व ती 'शिकण्याची प्रयोगशाळा' बनेल.







**गेल्या ५ वर्षातील साखर शाळेच्या विविध उपक्रमांची काही क्षणचित्रे**



**आपल्या मदतीच्या प्रतीक्षेत. .**

- Account Name – Vidyoday Mukatnagan parivar foundation
- Bank - HDFC Bank
- Account No. – 50200044699397
- IFSC Code – HDFC0000736

**प्रकल्प स्थळ - अब्दुल लाट, शिरदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.**

**विनायक माळी**
**सार्शा माळी**
**सह-संस्थापक,**
**विद्योदय मुक्तांगण परिवार फौन्डेशन**

**संपर्क : +91 9420608084**
**इमेल : contactvidyoday@gmail.com**
**vinayakmali90@gmail.com**
**वेबसाईट : www.vidyoday.org/**